नियमित दिवाणी दावा क्र.४५१/२०२४ मधील निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

संदीप खोत वगैरे विरुध्द महाराष्ट्र सरकार वगैरे

(CNR No.MHSN050028682024)

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र.४ यांच्याविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे.

२. जिल्हा सांगली, ता. वाळवा, मौजे शिगाव पैकी फार्णेवाडी मधील भूमापन क्रमांक ३६६/क/६, क्षेत्र १ आर म्हणजेच १००० चौ. फूट या मिळकतीस संक्षेपाकरीता सदर मिळकत असे संबोधण्यात येते.

३. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे, सदर मिळकत वादी यांच्या मालकी वहीवाटीची असून सदर मिळकतीबाबत कोणतेही संपादन, मागणी अथवा तदअनुषंगिक कोणतीही कार्यवाही झालेली नाही आणि कायदयाने ती होवू शकत नाही. अशी वस्तुस्थिती असताना वादीच्या मालकीच्या सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.४ हे अतिक्रमण करुन बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने कार्यालय बांधण्याच्या प्रयत्नात असल्याचे वादींना समजून आले आहे. प्रतिवादींना वादीच्या सदर मिळकतीमध्ये बांधकाम करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. वादी यांनी प्रतिवादींना नोटीस देवून तसे कळविले होते. तरीसुध्दा प्रतिवादी क्र.४ यांनी वादीचे सदर मिळकतीमध्ये

अनाधिकाराने अतिक्रमण करुन बांधकाम करणारच असे धमकाविले आहे. त्यामुळे वादी यांना त्यांच्या सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.४ यांनी कोणतेही बांधकाम करु नये अशी प्रतिवादी विरुध्द कायम मनाई आदेश होण्याकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. परंतु प्रस्तुत दाव्याचे सुनावणीस कालावधी लागणार आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाई आदेश होण्यासाठी दाखल केलेला आहे.

४. प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजुने आहे. प्रतिवादी यांना तुर्तातुर्त मनाई आदेश दिल्यास त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु तसे न झाल्यास वादीचे कशानेही भरुन न येणारे असे अतोनात नुकसान होणार असून त्यांना दावा मिळकतीस मुकावे लागणार आहे. करीता वादीचे सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.४ यांनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन कोणतेही बांधकाम करु नये व दावा मिळकतीमधील वादीचे शांततामय कब्जेवहीवाटीस हरहरकत करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश त्यांच्याविरुध्द पारीत करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र.४ यांनी सदर अर्जास नि.क्र.२४ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे, वादीच्या प्रस्तुत अर्जामधील मिळकतीचे वर्णन अपुरे व चुकीचे असून अर्जासोबत मिळकत ओळखता यावी असा कोणताही नकाशा हजर केलेला नाही. अर्जासोबत योग्य ती कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. मौजे शिगांव पैकी फार्णेवाडी या

गावचा सिटी सर्वे हा सन १९७९ साली झालेला आहे. त्यामुळे वादीने वर्णन केलेल्या मिळकतीचा सध्याचा सिटी सर्वे नंबर व जुना गट नंबर किती आहे याबाबत उल्लेख केलेला नाही. वादीने सदर मिळकतीचे मुळ मालक कोण व त्यांना सदर मिळकत कशी आली याबाबत काहीही नमूद केलेले नाही. फक्त फेरफार क्र.१४१५ च्या आधारे सदरची मालकी आल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. फेरफार क्र.१४१५ चे अवलोकन केले असता गट क्र.२८९ व ३६६/क/६ ही मिळकत मुळची कै. आक्काताई नरसिंह कदम व लक्ष्मीबाई खंडू पाटील यांच्या मालकीची दिसून येते. त्या दोघी मयत असल्याचे दिसून येते. कै. आक्काताई यांना महादेव नावाचा मुलगा आहे. त्यामुळे वादी यांनी फेरफार क्र.१४१५ नुसार आक्काताई कदम यांचे वारस म्हणून जे नाव लावले आहे ते बेकायदेशीरपणे लावलेले आहे. वादीने प्रतिवादी क्र.४ यांना दिनांक ०१.०८.२०२४ रोजी पाठविलेली नोटीस कै. आक्काताई कदम व लक्ष्मीबाई पाटील यांचे वारस या नात्याने पाठविल्याचे दिसून येते. त्यामध्ये गट क्र.३६६/क/५ व ३६६/क/६ या मिळकतीचा उल्लेख दिसून येतो. वादीच्या अर्जामध्ये त्यांच्या मालकीच्या दोन्ही मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करण्याचा मुळीच हक्क व अधिकार नाही असे नमूद केलेले आहे. परंतु फेरफार क्र.१४१५ पाहिला असता त्यामध्ये फक्त गट क्र.३६६/क/६ याचा उल्लेख दिसून येतो. त्यामुळे वादीनी गट क्र.३६६/क/५ मधील त्यांचा हक्क सोडून दिलेला आहे का किंवा त्यामध्ये त्यांना मालकी आहे किंवा नाही

याबाबत काहीही उल्लेख केलेला दिसून येत नाही.

६. प्रतिवादी क्र.४ हे त्यांच्या मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत, त्यामुळे वादीने अर्जामध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.४ हे कोणतेही बांधकाम करीत नाहीत. फार्णेवाडी गावचे आकारबंद पत्रक तयार झाले व शिगाव ग्रामपंचायतीमधील पूर्वीचा गट क्र.५९० यास त्यावेळी गट क्र.३६६ देण्यात आला. सन १९७९ साली शिगाव फार्णेवाडी या गावचा सिटी सर्वे होवून गट क्र.५९० पैकी काही क्षेत्र म्हणजे १३८७.५ क्षेत्र यास सि.स.नं.१ देण्यात आला व सदरची मिळकत गावठाण विस्तार योजनेसाठी ग्रामपंचायत फार्णेवाडी यांच्याकडे कब्जा देण्यात आला. सदर क्षेत्रात सध्या ग्रामपंचायतीचे कार्यालय असून त्यापैकी काही भाग राजारामबापू पाटील इंडोमेंट ट्रस्ट या व्यायाम शाळेला, तसेच पृथ्वीराज चव्हाण व्यायाम संस्थेला १५ ते १६ वर्षापूर्वी ठराव करुन दिलेल्या आहेत. तसेच सदर जागेचा काही भाग ग्रामपंचातीने लोकोपयोगी व लोककल्याणासाठी वापर करणेसाठी ठराव करुन दिलेला आहे. सध्या ग्रामपंचायत त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या जागेमध्येच सर्वसोयीनियुक्त असे ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम करीत आहे. सदर बांधकामास प्रशासकीय मान्यताही मिळाली आहे. त्यावेळी सदर जागा ग्रामपंचायत/जिल्हा परिषद यांच्या मालकीची असल्याबाबत खात्री केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी वादीचे जागेमध्ये बांधकाम करीत नसून ते स्वतःच्या मालकीच्या जागेमध्ये बांधकाम करीत आहेत. पूर्वीचा गट क्र.५९० या

मिळकतीचे भाग पडून गट क्र.३६६, ३६६/ब, ३६६/क/१ ते ३६६/क/७ असे उपभाग झालेले आहेत व त्याचवेळी सदर मिळकतीचा सिटी सर्वे झालेला आहे, तसेच त्यानुसार सिटी सर्वे रेकॉर्डनुसार प्रतिवादीचे मिळकतीस सि.स.नं.१ असा नंबर देण्यात आलेला आहे. सदर बांधकामास शासनाने बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी या योजनेतून फंडही मंजूर केलेला आहे. वादीनी सदरचा दावा हा राजकीय द्वेषाने केलेला आहे.

७. वादीने ग्रामपंचायतीविरुध्द दावा दाखल करत असताना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १८० नुसार दयावी लागणारी दावापूर्व नोटीस दिलेली नाही. वादीस गट क्र.५९० चा जो सिटी सर्वे झाला आहे त्याबाबतची दाद या न्यायालयात मागता येणार नाही. मौजे फार्णेवाडी यांनी गावठाण विस्तार करीत असताना वादी यांचे वडील कै. शामराव आबा खोत यांना घरासाठी जागा दिलेली होती. तथापी सदर जागा वादी व त्यांच्या पुर्वज यांनी अन्य इसमांना विक्री केलेली आहे. त्यामुळे वादी यांची सध्या मौजे फार्णेवाडी गावठाण येथे कोणतीही मिळकत शिल्लक नाही. न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजुने असून वादीचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. करीता प्रतिवादी क्र.४ यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

८. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना प्रस्तुत दाव्याचे समन्स लागुनही ते हजर न

झाल्याने त्यांच्याविरुध्द नि.क्र.१ वरील आदेशाप्रमाणे सदर दावा एकतर्फा चालविण्यात आला.

९. अर्ज व त्यावरील जबाब वाचला, दोन्ही बाजूच्या वकीलांनी केलेला युक्तिवाद ऐकला, तसेच न्यायालयीन अभिलेखात दाखल कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता निशाणी क्रमांक ५ चे आदेशाकरीता खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे –

अ.क्र.	**प्रश्न**	**निष्कर्ष**
१	प्रथमदर्शनी प्रकरण त्यांच्या बाजूने आहे हे वादी यांनी सिध्द केले आहे काय ?	नकारार्थी.
२	न्यायाचा समतोल हा त्यांच्या बाजूने आहे हे वादी यांनी सिध्द केले आहे काय ?	नकारार्थी.
३	तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास त्यांचे पैशाचे स्वरुपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे वादी यांनी सिध्द केले आहे काय ?	नकारार्थी.
४	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमिमांसा

१०. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने त्याच्या भूमापन क्र.३६६/क/६ या एक आर क्षेत्रामध्ये प्रतिवादी ग्रामपंचायत बांधकाम करीत असल्याचे कथन केलेले आहे. सदर बांधकामामुळे वादीच्या स्थावर मिळकतीतील हक्कांना बाधा पोहोचत असल्याने सदर

बांधकाम थांबविण्याकामी मनाई आदेशाची विनंती केली आहे. केलेली कथने व मागितलेली विनंती यांचा विचार करता वादीवर प्रथमतः जबाबदारी निर्माण होते की, वाद मिळकत त्याच्या कब्जेवहीवाटीत असून सदर मिळकतीचा उपभोग घेण्याचा त्याला हक्क आहे. त्यानंतर सदर मिळकतीवर प्रतिवादी क्र.४ यांचे बांधकाम सुरु असून सदर बांधकामामुळे वादीच्या हक्काला बाधा येत आहे.

११. वादीने त्याच्यावर निर्माण झालेली जबाबदारी पार पाडण्यासाठी वाद मिळकतीच्या नमुना नं.८ आधार घेतला व वाद मिळकत त्याच्या मालकी व वहीवाटीत असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला, त्याचबरोबर प्रतिवादी क्र.४ बांधकाम करत असल्याचे दर्शविण्यासाठी बांधकाम चालू असलेल्या क्षेत्राची छायाचित्रे दाखल केली. सदर विनंतीच्या अनुषंगाने वादीने युक्तीवाद केला की, वाद मिळकत वारसा हक्काने त्याच्या मालकी वहीवाटीत आलेली असून प्रतिवादी यांनी वादीचा हक्क डावलून सदर मिळकतीवर बांधकाम सुरु केले आहे. त्याउलट प्रतिवादीने दाव्यातील कथीत सदर मिळकतीशी वादीचा संबंध नाही यासोबत प्रतिवादीचे बांधकाम सदर मिळकतीवर नसल्याचे कथन केले. या कथनास आधार म्हणून प्रतिवादीने सदर मौजे फार्णेवाडी येथे सिटी सर्वे झाला त्याबाबतच्या चौकशी वहीचा उतारा दाखल केला आणि कथन केले की, सदर क्षेत्र भिन्न असून वादी केवळ नमूना नं.८ च्या दस्ताच्या आधाराने प्रतिवादीचे काम गैरहेतुने बंद पाडण्याचा प्रयत्न करीत आहे. मौजे फार्णेवाडी येथे सिटी सर्वे

झाल्यानंतर सर्व मिळकतींना नगरभुमापन पडलेला आहे. असे असताना वादीने त्याच्या वाद मिळकतीचा नगरभुमापन क्रमांक सांगितला नाही. एवढेच नाही तर चतुःसिमाही कथन केलेल्या नाहीत. वादीने त्याच्या दाव्यामध्ये व मनाई अर्जामध्ये वाद मिळकतीच्या चतुःसिमा नमूद केल्या नाहीत, त्याचबरोबर सिटी सर्वे उतारा दाखल केला नाही या सर्व कारणांने वादी मनाई अर्जाच्या अनुतोषास पात्र नाही असे सांगितले.

१२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. त्याचबरोबर संचिकेत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

१३. विवेचनापूर्वी येथे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रकरण पुरावा पूर्व स्थितीस असल्याने सदर प्रकरणात वादी व प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ दाखल केलेली कागदपत्रे सिध्द होणे बाकी असतानाही विचारात घेण्यात येत आहेत.

१४. करीता प्रस्तुत अर्ज सकृतदर्शनी बाजू, भरून न येणारे नुकसान व सोईचा समतोल या तीन तत्वांच्या आधारे वरील विवेचनाच्या प्रकाशात विचारात घेण्यात येतो.

मुद्दा क्र.१ करीता –

१५. तात्पुरत्या मनाई आदेशाच्या अनुतोषाचा विचार करताना सकृतदर्शनी बाजु या तत्त्वाचा विचार होणे सर्वात महत्वाचे आहे. कागदपत्रांचे अवलोकन करता हे स्पष्ट होते की, मौजे फार्णेवाडी येथील भुमापन क्र.३६६/क/६ या क्षेत्रामध्ये वादी संदीप यास आक्काताई व लक्ष्मीबाई यांच्या मृत्यूनंतर सहवारस म्हणून फेरफार

क्र.१४१५ नुसार इतर वारसांसह अधिकार मिळालेला आहे. याद्वारे स्पष्ट होते की, सदर क्षेत्रामध्ये वादीचा हितसंबंध आहे. पुढे संचिकेतील वादीतर्फे दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता मोकळया भुखंडावर आर. सी. सी. बांधकाम सुरु झाले आहे हे स्पष्ट होते. सदर बांधकाम त्याच्या क्षेत्रावर आहे असे वादीने प्रतिपादीत केले आहे. त्याउलट प्रतिवादीने नगरभूमापन क्रमांक १ च्या मालमत्ता पत्रकाच्या आधारे सदर बांधकाम त्यांच्या क्षेत्रात असून वादीचा सदर क्षेत्राशी संबंध नाही असा बचाव घेतलेला आहे.

१६. वाद मिळकतीमध्ये असलेला हक्क वादीने फेरफार क्रमांक १४१५ नुसार सकृतदर्शनी दर्शविला. परंतु प्रतिवादीने युक्तीवाद केल्याप्रमाणे मौजे फार्णेवाडी येथे सिटी सर्वे झाला असल्याने आजरोजी ग्रामपंचायत मिळकतींना स्वतंत्र नगरभूमापन क्रमांक मिळालेला आहे आणि त्याप्रमाणे मालमत्तापत्रकेही निर्गमित होत आहेत. असे असताना वादीने त्याच्या मिळकतीचा नगरभूमापन क्रमांकाच्या मालमत्ता पत्रकाची प्रमाणीत प्रत का दाखल केली नाही याबाबत कोणताही खुलासा नाही. त्याचबरोबर मनाई अर्जाच्या अनुतोषाचा विचार करता प्रतिपक्षास एखादी कृती करण्यापासून अवरोधीत करणे अथवा एखादी कायदेशीर कर्तव्याची कृती करण्यास भाग पाडणे असे दोन्ही अनुतोष मंजूर करता येवू शकतात.

१७. दाव्यातील कथने पाहता वादीने प्रतिवादीस बांधकामाच्या कृतीपासून अवरोधीत करण्याची विनंती केलेली आहे. वर कथन केल्याप्रमाणे वाद मिळकतीच्या

नगरभूमापन क्रमांकाविषयी कोणताही खुलासा नाही. सर्वात महत्वाचे की, वादीने त्याच्या क्षेत्राच्या चतुःसिमांचा कोणताही उल्लेख केलेला नाही. क्षणभर असे गृहीत धरु की, वादीकडे नगरभूमापन क्रमांकाची माहीती नाही. पण वादीला त्याच्या क्षेत्राच्या चतुःसिमाही माहीती नाही ही बाब आश्चर्यजनक आहे. मनाई अर्जाच्या अनुतोषाचा विचार करताना ज्यावेळेस केवळ मालमत्ता क्रमांकाने मिळकतीची ओळख पुरेशी स्पष्ट होत नसेल अशा वेळेस सदर मिळकतीच्या चतुःसिमा महत्वाचा आधार ठरतो. परंतु प्रस्तुत अर्जात व दाव्यामध्ये चतुःसिमांचा कुठेही उल्लेख नाही. प्रतिवादीतर्फे दाखल आकारबंद चौकशी उता–याचे अवलोकन करता गट क्र.३६६ याचे एकूण क्षेत्र २६ गुंठे असून त्यामध्ये ३६६/क आणि सदर ३६६/क मध्ये भूखंड क्रमांक ६ याची स्थान निश्चिती असणे आवश्यक आहे. वादीने या बाबत कोणताही खुलासा केलेला नाही. या सर्व बाबींचा विचार करता वादीने त्याची सकृतदर्शनी बाजू समाधानकारकरित्या दर्शविली नाही या निष्कर्षास येवून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

<u>**मुद्दा क्र.२ व ३ करीता –**</u>

१८. सोईचा समतोल या तत्वाचा विचार गैरसोईचा समतोल या बाजुनेसुध्दा करणे आवश्यक आहे. कारण दाव्यामध्ये अदयाप पुरावे दाखल होवून हक्क निश्चिती होणे बाकी आहे. असे असताना केवळ ज्या कागदपत्रांवर दोन्ही पक्षांनी आपापली भिस्त ठेवली आहे त्यांचा आधार घेवून आदेश पारीत केला जातो. त्यामुळे न्यायालयाच्या

आदेशामुळे एखादया पक्षास गैरवाजवी फायदा होवू नये अथवा तोटा होवू नये या दोन्ही बाबी टाळणे आवश्यक आहे. म्हणून सोय व गैरसोय या बाबी एकत्रात विचारात घेण्यात येतात.

१९. वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी बांधकाम करत आहेत असे वादीने कथन करुन मनाई आदेशाची विनंती केली आहे. तर प्रतिवादीने सदर बांधकाम त्यांच्या क्षेत्रात असून त्यामुळे वादीच्या कोणत्याही हक्काला बाधा येत नाही असे कथन केलेले आहे. ज्या बांधकामाला वादी अवरोधीत करुन मागत आहे ते बांधकाम प्रतिवादीच्या कथनानुसार ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे आहे आणि सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. कोणतीही प्रशासकीय मान्यता मिळताना सदर क्षेत्राच्या मालकीचा विचार आणि खात्री सर्वप्रथम केली जाते. असे असताना केवळ नमुना नं.८ च्या आधारावर कोणत्याही चतुःसिमा स्पष्ट नसताना कथीत बांधकाम वादीच्या क्षेत्रात आहे असे गृहीत धरुन जर बांधकामास मनाई केली तर त्यामुळे सामान्यपणे सर्वसामान्य लोकांना अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच गावाच्या विकासास सुध्दा अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वादीच्या हक्कात सोईचा समतोल नाही.

२०. वाद मिळकतीवरील बांधकामामुळे वादीचे भरुन न येण्याजोगे नुकसान होण्याची परिस्थिती नाही. कारण वादी त्याच्या हक्काचे जतन अन्य रितीने करु शकतो. उलटपक्षी जर वादीने पुराव्याद्वारे सिध्द केले की, सदर बांधकाम त्याच्या क्षेत्रात आहे

अशा वेळेस बांधकामाबाबत झालेल्या खर्चाचे नुकसान वादीचे होणार नाही आणि वादी त्याच्या भूखंडाच्या अधिकारापासून वंचितही होत नाही. करीता वादीचे भरुन न येण्याजोगे नुकसान होत असल्याचे त्याने सिध्द केलेले नाही. करीता मुद्दा क्रमांक २ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

प्रश्न क्र.४ बाबत –

२१. वादीने सकृतदर्शनी त्यांचे हक्क, त्या हक्कांना जतन करण्याची परिस्थिती, आदेश न झाल्यास भरून न येण्याजोगे नुकसान आणि सोईचा समतोल हे सर्व घटक त्याच्या बाजुने असल्याचे समाधानकारकरित्या सिध्द केलेले नाही. त्यामुळे वादी तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या आदेशास पात्र नाहीत. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

तुर्तातुर्त मनाई अर्ज निशाणी क्रमांक ५ फेटाळण्यात येतो.

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2024.12.10 16:34:47 +0530

इस्लामपूर. **(मुकुल म. चितळे)**

दिनांकः–१०.१२.२०२४ **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.**

<u>प्र मा ण प त्र</u>

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव	-	सतिश कृष्णा पाटील,
कोर्टाचे नाव	-	दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर.
आदेश घोषीत दिनांक	-	**१०.१२.२०२४**
पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक-		**१२.१२.२०२४**